महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

दूरध्वनी क्र.०२२-२४९२७६३१.
इ-मेल-_dma7scheme2@gmail.com
संकेतस्थळhttps://mahadma.maharashtra.gov.in

सातवा मजला, बेलापुर भवन,सेक्टर-11, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई – 400614,कार्यासन क्र.०७.

क्र.नपप्रसं/ योजना परिपत्रक / २०२६/का.७/2245189 दिनांक:- 08 MAY 2026

विषय:-नगरविकास विभागाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या काही शासन निर्णयात कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) असलेल्या शासन निर्णयाचा निधी कार्यान्वयीन यंत्रणेला वितरीत करण्याऐवजी संबधित महानगरपालिका /नगरपालिका/नगरपंचायत यांच्या मार्फत कार्यान्वयीन यंत्रणेला वितरीत करणेबाबत.

# -:परिपत्रक:-

नगर विकास विभागामार्फत विविध योजनांचा निधी वितरीत करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात येतात. सदर शासन निर्णयांन्वये नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून निधी संबधित जिल्हा सह आयुक्त यांना वितरीत केला जातो. काही शासन निर्णयामध्ये कार्यान्वयीन यंत्रणा ही सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD)असल्याने तो निधी जिल्हा सह आयुक्त कार्यालयामार्फत थेट सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) यांना वर्ग करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियंत्रणाखालील कामांची प्रभावी अंमलबजावणी, आर्थिक शिस्त, पारदर्शकता व उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने निधीचा प्रवाह हा संबंधित महानगरपालिका/नगरपरिषद / नगरपंचायत यांच्यामार्फत होणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने, पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

1. नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या विविध योजनांचा निधी हा (ज्या शासन निर्णयामध्ये कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) आहे) अशा शासन निर्णयाचा निधी जिल्हा सह आयुक्त यांनी थेट सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) यांना वितरीत न करता तो संबधित महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत यांना वितरीत करण्यात यावा.
2. त्यानंतर संबंधित महानगरपालिका/नगरपरिषद / नगरपंचायत यांनी, शासन निर्णयातील अटी व शर्ती तसेच आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक मान्यता झाल्यानंतरच , सदर निधी सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) यांना वर्ग करावा.

3. कामांची अंमलबजावणी, गुणवत्ता नियंत्रण व वेळेत पूर्णत्वाबाबत संबंधित महानगरपालिका आयुक्त व नगरपरिषद/नगरपंचायत मुख्याधिकारी यांनी वेळोवेळी आढावा घेण्यात यावा .
4. निधीचा उपयोग, खर्च विवरण व प्रगती अहवाल नियमितपणे संबंधित महानगरपालिका आयुक्त व नगरपरिषद/नगरपंचायत मुख्याधिकारी यांनी जिल्हा सह आयुक्त कार्यालयामार्फत नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सादर करण्यात यावा.
5. ज्या शासन निर्णयाचा निधी हा सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD)यांच्या मार्फत खर्च करण्यात येणार आहे, त्या शासन निर्णयाचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायत यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) यांच्याकडून घेऊन ते जिल्हा सह आयुक्त कार्यालयामार्फत नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सादर करण्यात यावे.
6. महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायत यांच्या खात्यातील निधीवर मिळणारे व्याज हे संबंधित योजनेच्या निधीत जमा करणे आवश्यक राहील.
7. निधीचा गैरवापर, विलंब किंवा नियमभंग आढळल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

वरील सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

मा. आयुक्त तथा संचालक, नपप्रसं यांच्या मान्यतेने.

(संजय काकडे)
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई